
Rotary | PDMDS



**रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर** आणि
**पार्किन्संस डिसीज अँड मुव्हमेंट डिसओर्डर सोसायटी**
यांचा संयुक्त उपक्रम

# आरोग्य

## पार्किन्संस आजार (कंपवात)

**बुलेटिन नं.: ०२** | **दिनांक : २६/०२/२०२०**

### डॉ. राहुल दिवाण ( DNB Medicine, Neurologist )



पार्किन्संस डिसीज / कंपवात हा छोट्या मेंदूमधील काही विशिष्ट पेशींचे कार्य कमी झाल्यामुळे होत असते. हात/पाय यांची थरथर, तोल जाणे, हालचाल मंदावणे. ही या आजाराची प्रमुख लक्षणे आहेत. हा आजार वयोमानानुसार वाढत जातो. पार्किन्संस आजार उत्तम प्रकारे आटोक्यात ठेवण्यासाठी औषधे आता उपलब्ध आहेत.

योग्य उपचाराने हा आजार आटोक्यात राहू शकतो. औषधोपचार आयुष्यभर सुरू ठेवावे लागतात. ज्यांना औषधांचे उपचार सहन होत नाहीत अशा पेशंटसाठी **D.B.S.** ही उपचार प्रणाली उपयोगी येते.



पार्किन्संस रुग्णांना इतर आजारांसाठीची औषधे घेण्यापूर्वी त्या औषधांचा दुष्परिणाम होऊन पार्किन्संस वाढण्याचा धोका असतो. त्यामुळे त्याची काळजी घेणे महत्त्वाचे असते. काही पेशंटमध्ये भास होणे हा त्रास उद्भवू शकतो. तो आजारामुळे होऊ शकतो. तसेच औषधांमुळे सुद्धा होऊ शकतो.

औषधांबरोबर फिजिओथेरपी व पार्किन्संस पुर्नवसन केंद्राचा उपचारात मोठा फायदा होतो. या आजारात तोल जात असल्यामुळे, घरात तोल जाऊन पडू नये यासाठी विशेष काळजी घेतली गेली पाहिजे.

**सूचना :** हल्ली सोशल मिडिया वर एका इंजेक्शनद्वारे पार्किन्संस कसा बरा होतो हा व्हिडीओ आढळून येतो. तसा प्रचार चुकिचा आहे. असे इंजेक्शन फक्त फ्रिजिंगमध्ये वापरतात. ते तात्पुरते उपयोगात येते आणि भारतात प्रायोगिक तत्वावर वापरतात.

## मागील महिन्यातील उपक्रमांची माहिती

मागील महिन्यात मार्शल आर्ट मधील एक प्रकार- थाय ची, बॅलन्स व पायांचा व्यायाम, काठीचे व्यायाम, समुपदेशन इ. विषयी माहिती देण्यात आली तसेच व्यायाम प्रकार घेण्यात आले. ह्या व्यायाम प्रकारातून पाय, कंबर, हात, बोटे, मान इ.चा व्यायाम घेण्यात आला. मार्शल आर्टमधील व्यायाम प्रकार पार्किन्संसमध्ये फार उपयुक्त आहे.





## रोटरीचे पार्किन्संस संचालक मंडळ

१) रो. अरूणकुमार गोयंका
२) रो. अमीत माटे
३) रो. दिलीप हळदीकर
४) रो. सुभाष मालू
५) रो. गजेंद्र वसा
६) रो. नारायण पटेल
७) रो. गिरीष जोशी
८) रो. डॉ. मेघराज चूग
९) रो. हरिषचंद्र शर्मा
१०) सौ. सुनिता गोयंका
११) श्रीमती सरला मंत्री

## पार्किन्संस स्टाफ



**डॉ. जानवी ठाकूर**
(BPTh)
फिजिओथेरपीस्ट
9850820822



**आकाश बिरांजे**
प्रकल्प समन्वयक
9011129563

## उदार देणगीदार

**श्रीमती सरला मंत्री** यांनी आपला अत्यंत महत्त्वाचा उपक्रम पाहून व त्याचा उपयोग सर्वांना व्हावा म्हणून आपले पती कै. पुरुषोत्तम मंत्री यांचे स्मरणार्थ प्रत्येक महिन्यास रु.तीन हजार देणेचे कबूल केले आहे. त्यांचा पहिला चेक मिळाला. आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

# रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर
# पार्किन्संस पुर्नवसन केंद्र

**१) पार्किन्संस आजार म्हणजे काय ?**

स्थूलमानाने असे सांगता येईल की, मज्जासंस्थेतील डोपामाईन या रसायनाच्या नष्ट होण्याने हा आजार निर्माण होतो. मज्जासंस्थेतील डोपामाईन हे मेंदूमधील कोणताही हुकूम/आज्ञा पोहचवण्याचे काम करते तसेच हलचालींचे नियोजन करण्याचे काम हे डोपामाईन करते जर, डोपामाईन कमी पडल्यास शरीराच्या हालचालीवर व कांही अंतर्गत लक्षणांवर त्याचा परिणाम होतो. हलचाल मंद होतात व कालांतराने हा आजार हळूहळू वाढत जातो. मुख्य म्हणजे हा आजार कोणत्याही वयात होऊ शकतो. हा आजाराची सुरवात हळूहळू होते. एकाच हाताच्या कंपवाताच्या लक्षणापासून हा आजार सुरू होतो.

**२) पार्किन्संस आजाराची लक्षणे कोणती ?**

१) हातापायांची अनियंत्रित हलचाल (कंपन)

२) स्नायू अखडतात व त्यांच्यातील लवचिकता कमी होते.

३) स्नायू ताठ व कडक होतात.

४) चेहऱ्यावर भावना दिसत नाही.

५) आवाज व बोलण्यात बदल होतो.

६) शरीर पुढे झुकते व चालण्यात किंवा तोल सांभाळण्यात दोष निर्माण होतो.

७) जेवण गिळायला त्रास होणे.

**३) पार्किन्संस आजार कोणास होतो ?**

हा आजार प्रामुख्याने वय वर्षे ४० ते ५० पेक्षा जास्त असलेल्या व्यक्तीमध्ये हा आजार होण्याची शक्यता जास्त असते. तरुणांमध्ये या आजाराचे प्रमाण कमी आहे. पण कोणत्याही वयात हा आजार उद्भवू शकतो.

**४) हा आजार होण्यामागची कारणे ?**

मुळात या आजारावर संशोधन सुरू आहे. निश्चित असे कारण नाही. मात्र पुढील कारणांमुळे हा आजार होऊ शकतो.

१) मेंदूला सतत मार लागून, धक्का बसून ही पार्किन्संसहा आजार होऊ शकतो. प्रसिद्ध बॉक्सिंग खेळाडू महमंद अली यांना हाच आजार झाला होता.

२) काहीवेळा औषधांचे दुष्परिणाम म्हणूनही पार्किन्संस आजार होऊ शकतो. तसेच बराच काळ सतत काही औषधे घेतल्यामुळे पार्किन्संस होऊ शकतो.

३) अफूच्या व्यसनामुळे सुद्धा हा आजार होऊ शकतो.

४) किटकनाशकाशी वारंवार संबंध येऊन ते पोटात गेल्यास हा आजार होण्याचा धोका असतो.

५) 'अनुवांशिकता' हे सुद्धा कारण असू शकते.

**५) औषधोपचार :**

पार्किन्संस या आजारात औषधांचा वापर हा त्यांच्या लक्षणांवर अवलंबून असतो. मुळातच ह्या आजाराची लक्षणे विभिन्न आहे. त्यामुळे डॉ. सल्ल्यानुसार ज्यांच्या त्यांच्या लक्षणांवर अवलंबून असतो.

क्रमशः पुढील अंकात

## सुंदर उपचार पद्धती



**- एस.एस. मोमिन**

पार्किन्संसमुळे हाताचा कंपवातावरील उपचार. लक्ष देऊन काम केल्यामुळे किती सुबक आकृती आली आहे पहा !!!

## मनोगत



**श्री. प्रकाश पाटील :** ''मी गेले वर्षभर दर शनिवारी नाना-नानी या ठिकाणी चालवण्यात येणाऱ्या रोटरीच्या पार्किन्संस पुर्नवसन केंद्रात येतो. आम्हाला गेले वर्षभर डॉ. जानवी ठाकूर व आकाश बिरांजे यांच्याकडून मार्गदर्शन व फिजिओथेरपी तसेच इतर वेगवेगळ्या उपक्रमातून आम्हा पार्किन्संस आजार असणाऱ्यांसाठी काम करत आहेत. यातून आमच्याकडे फार फरक जाणवतो. आम्हांस मानसिक स्वास्थ देखिल मिळत आहे. चालणे, बोलण्यात फरक जाणवतो. असेच आमच्यावर आपले प्रेम राहो... धन्यवाद रोटरी..!!!''

---


हार्दिक शुभेच्छा

**कमला कॉलेज, कोल्हापूर**

NAAC 'A' Grade (3.12 CGPA)

**(College with Potential for Excellence)**

राजारामपुरी १ ली गल्ली, कोल्हापूर - ४१६ ००८

फोन : ०२३१-२५२२२१६

स्त्री शिक्षणामध्ये अग्रेसर महिला महाविद्यालय

महाविद्यालयामध्ये शिकविले जाणारे अभ्यासक्रम

बी. ए., बी. कॉम., बी.सी.ए.

बी. व्होक कोर्सेस १) रिटेल मॅनेजमेंट ॲण्ड आय.टी. २) फुड प्रासेसिंग ॲण्ड मॅजेनमेंट

एम. ए. (इंग्रजी, होमसायन्स, योगशास्त्र) पी.जी. डिप्लोमा इन योगा थेरपी

याबरोबरच सात करिअर ओरिएंटेड सर्टिफिकेट कोर्सेस

**प्राचार्या डॉ. तेजस्विनी बी. मुडेकर**
**कमला कॉलेज, कोल्हापूर**

**प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील**
**कार्यकारी अध्यक्ष, ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर**


---

Rotary | PDMDS

# रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर

## पार्किन्संस डिसीज अँड मुव्हमेंट डिसओर्डर सोसायटी


**कोल्हापूर कार्यालय :**
**रोटरी समाज सेवा केंद्र,**
कलेक्टर ऑफिस रोड,
कोल्हापूर.

**संपर्क :**
**०२३१-२६५१४४४**
**+९१-९०११२९५६३**
rotarykolhapur@gmail.com


**बुलेटिन एडिटर : रो. दिलीप हळदीकर - ९९२१८९२०२०**